र, ३ मे २०१९

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । शुक्रवार, ३ मे २०१९

विवेकानंद कॉलेज

'महाराष्ट्र राज्याच्या स्वतंत्र निर्मितीसाठी अनेक क्रांतिकारकानी आपले बलिदान दिले. त्यांच्या कार्याचे स्म्रण करणे हीच खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याला आदरांजली आहे' असे विचार स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयात ५९ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्राचार्य साळुंखे यांच्या ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य धनराज भोसले उपस्थित होते. जिमखाना प्रमख प्रा. किरण पाटील यांनी प्रास्ताविक केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, ३ मे

विवेकानंद महाविद्यालय :

विवेकानंद महाविद्यालयात ५९ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य एस. वाय. होनगेकर, डॉ.बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटचे प्राचार्य धनराज भोसले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील यांनी केले. याप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था परिसरातील शाखामधील विवेकानंद कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, इंजिनिअरिंग कॉलेज, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेजमधील प्राध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते. १५

पुढारी संमिश्र कोल्हापूर । शुक्रवार, ३ मे २०१९

सूर्याभोवतीच्या तेजोवलयाचे दर्शन

कोल्हापूर : प्रतिनिधी

इंद्रधनुष्याप्रमाणे सूर्याभोवती रंगीबेरंगी दिसणाऱ्या पूर्णाकृती तेजोवलयाचे दर्शन कोल्हापूरकरांना बुधवारी घडले. भरउन्हात दुपारी बाराच्या सुमारास सूर्याभोवती तयार झालेले गोलाकार रिंगण लक्षवेधी ठरले.

सूर्याभोवती निर्माण होणाऱ्या रिंगणास इंग्रजीमध्ये 'हेलो' असे म्हणतात. हेलो म्हणजे इंद्रधनुष्याचे प्रभा मंडल. आकाशात सुमारे २० हजार फूट उंचीवर 'सीरस' नावाचे ढग तयार होतात. या ढगांमध्ये लाखोंच्या संख्येने लहान-लहान बर्फाचे क्रिस्टल असतात. या क्रिस्टलमधून सूर्याची किरणे गेल्यानंतर त्यामधील काही किरणे परावर्तित होतात. त्यामुळे आपणास हेलो पाहावयास मिळतो.

कोल्हापूर : सूर्याभोवती तयार झालेले इंद्रधनुष्याप्रमाणे तेजोवलय.

(छाया : पप्पू अत्तार)

सूर्याभोवती जो गोल तयार होतो त्या गोलाची त्रिज्या २२ डिग्री एवढी असते. म्हणून यास २२ डिग्री हेलो असेही म्हणतात.

सूर्याभोवती निर्माण होणाऱ्या रिंगणाच्या आतील बाजूला लाल रंग आणि बाहेरच्या बाजूला निळा रंग दिसतो. लाल आणि निळा हे रंग डोळ्यांना जास्त संवेदनशील आहेत. सूर्याबरोबरच चंद्राभोवतीदेखील अशाप्रकारचे रिंगण तयार होते. ही खगोलशास्त्रीय घटना आहे. मात्र, सूर्य व चंद्राभोवती तयार होणारे रिंगण वाईट काळ येणार अशी केवळ अंधश्रद्धा आहे, अशी माहिती विवेकानंद महाविद्यालयाच्या पदार्थ विज्ञान व खगोलशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. मिलिंद कारंजकर यांनी दिली.